# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/11531 /२०१७, पुणे शहर, दिनांक - २९.१२.२०१७

**विषय :- दिनांक ३१/१२/२०१७ रोजी, हडपसर, येरवडा,पुणे कॅम्प,डेक्कन भागातील रोडवरील वाहनांचे डायव्हर्शन/तात्पुरत्या स्वरुपात बंदी तसेच नो-व्होईकल झोन व विविध चौकातील सिग्नल चालू राहण्याच्या विहीत वेळेपेक्षा अधिक वेळ वाढ याबाबत वाहतुकीतील बदला बाबत.**

-------oo-------

दिनांक- ३१/१२/२०१७ रोजी चालू वर्षाची सांगता व नविन वर्ष स्वागताचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरीक शहरातील वेगवेगळ्या रस्त्यांवर गर्दी करीत असतात, तसेच शहरातील सरस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात रहदारी असते त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी,अशोक मोराळे,पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शंहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन हडपसर, येरवंडा, पुणे कॅम्प,डेक्कन भागातील रोडवरील वाहनांचे डायव्हर्शन/तात्परत्या स्वरुपात बंदी तसेच नो-व्होईकल झोन व विविध चौकातील सिग्नल चालू राहण्याच्या विहीत वेळेपेक्षा अधिक वेळ वाढ याबाबतच्या वाहतुकीतील बदला बाबतचे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## १. हडपसर भागातील दिनांक ३१/१२/२०१७ रोजी सायं. १९.०० वा.पासून दि.०१/०१/२०१८ रोजीचे रात्रौ ०१.०० वा. पर्यंत मगरपट्टा खराडी बायपास रोडवर वाहनांचे डायव्हर्शन.

१. अमनोरा मॉल येथून बाहेर येणारी वाहने डावीकडे वळून जातील उजवीकडे किंवा सरळ जाणार नाहीत नाहीत.खराडीकडे जाणारी वाहने ही मगरपट्टा मेनगेटने इच्छितस्थळी जातील.

२. सिझन मॉल समोरील रोडवरुन मटेरीयल गेट येथून मगरपट्टा रोडकडे येण्यास मनाई करण्यात येत असून सिझन मॉल समोरुन वाहने रोड क्रॉस करुन जाणार नाहीत.मगरपट्टयाकडे जाण्यासाठी वाहनांनी रेल्वेब्रिज खालून यु टर्न करुन इच्छितस्थळी जातील.

३. खराडीकडे जाणारी मालवाहू हलकी व मध्यम वाहनांनी नोबल हॉस्पीलटल जवळून डावीकडे वळून मगरपट्याचे पाठीमागील डीपीरोडने हडपसर रेल्वे उड्डान पुलावरुन इच्छितस्थळी जावे.

## २. येरवडा भागात दिनांक- ३१/१२/२०१७ रोजी सायं. १७.०० ते रात्रौ २४.०० वा.पर्यंत जड वाहनांना प्रवेश बंद बाबत.

खराडी बायपास चौक ते शास्त्रीनगर चौक, लुप रोडवरील शास्त्रीनगर चौक ते आंबेडकर चौक या रोडवर सध्या सर्व प्रकारच्या स्थानिक अवजड वाहनांसह सर्व प्रकारच्या जड वाहनांना सकाळी ०८.०० ते ११.०० वा. व सायंकाळी १७.०० वा. ते २१.०० या वेळेत येणे-जाणेकरीता प्रवेश बंदी असून सदर वेळेत वाढ करुन दिनांक- ३१/१२/२०१७ रोजी सायंकाळी १७.०० ते रात्री २४.०० वाजे पर्यंत जडवाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

## ३. पुणे लष्कर(कॅम्प) भागातील वाहतूकीचे डायव्हर्शन-

१. वाय जंक्शन- खान्या मारुती चौकाकडून येणारी वाहतूक ईस्ट स्ट्रिट रोडने होल्गा चौकाकडे जातील.
२. व्होल्गा चौक- - व्होल्गा चौकातून प्रित मंदीर चौकाकडे तसेच इंदिरा गांधी चौकाकडे जातील
३. लष्कर पोलीस स्टेशन चौक- इंदिरा गांधी चौकातून उजवीकडे वळून लष्कर पोलीस स्टेशन चौक डावीकडे वळून तीन तोफा चौकाडे जातील.
४. तीन तोफा- तीन तोफा चौकाकडे उजवीकडे वळून एसबीआय हाऊसकडे जातील.
५. यामाहा शोरुम- कुरेशी मशिद कडून येणारी वाहतूक १५ ऑगस्ट चौकाकडून सुजाता मस्तानी लेन येथून इच्छित स्थळी जातील.
६. बिशप सर्कल- मम्मादेवी येणारी वाहतूक बिशप सर्कल येथून गुरुद्वारा रोडने एसबीआय हाऊस येथून इच्छितस्थळी जातील.

## ४. नो-व्हेईकल झोन, (दिनांक- ३१/१२/२०१७ रोजी १८.०० वा. ते दि.०१/०१/२०१८ रोजी पहाटे ०५.०० वा.)

१.फर्ग्युसन रोड- गुडलक चौक ते फर्ग्युसन कॉलेज मेनगेट पर्यंत
२.एम.जी.रोड- हॉटेल अरोरा टॉवर चौक ते ट्रायलक हॉटेल चौक (पुलगेट चौकी) पर्यंत.

## ३. शहरातील विविध चौकातील सिग्नल चालू राहण्याच्या दिनांक-३१/१२/२०१७ रोजीचे विहीत वेळेपेक्षा जास्त वेळेत वाढ केले बाबत.

१. संतकबीर चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०१.०० वा.पर्यंत.
२. डॉ.बॅनर्जी चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०१.०० वा.पर्यंत.
३. जेधे चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
४. मार्केटयार्ड चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
५. ढोले पाटील चौक,वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
६. वखार चौक, वेळ - दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
७. गंगाधाम चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
८. नळस्टॉप चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
९.सहजिवन चौक, वेळ - दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
१०.पौडफाटा चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
११.हुतात्मा चौक, वेळ - दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
१३.कोथरुड डेपो चौक, वेळ-दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०५.०० वा.पर्यंत.
१४.भैरोबानाला चौक, वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०२.३० वा.पर्यंत.
१५.फातिमानगर चौक, वेळ-दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०२.३० वा.पर्यंत.
१६.सोपानबाग चौक,वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०२.३० वा.पर्यंत.
१७.रामटेकडी चौक,वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०२.३० वा.पर्यंत.
१८.घोरपडी जंक्शन चौक,वेळ- दिनांक- ०१/०१/२०१८ रोजी ०२.३० वा.पर्यंत.